युवा सकाळ
मंगळवार,
२५ ऑक्टोबर २००५



रापचिक बिंधास कल्टी

# 'शब्दच्छल'

महेश सुदाम नारके

एखादी प्रतिक्रिया आणि त्यासाठी वापरलेले शब्द किती चपखलपणे भावनांचा स्रोत समोरच्या व्यक्तीपर्यंत पोचवू शकतात, याची फार 'बोलकी' उदाहरणे कॉलेजच्या कॅम्पस अगर कट्ट्यावर ऐकायला मिळतात. कॉलेजच्या दिवसांत अशा शब्दांची जणू काही 'डिक्शनरीच' आपल्यासमोर उलगडते आणि आपणही मग आपल्याला झेपतील (सूट होतील) असे शब्द सुरवातीला संकोचाने आणि नंतर 'बिंधास'पणे वापरू लागतो.

'क्या बात है।' अशीच एक सर्वमान्य आणि खानदानी प्रतिक्रिया. म्हणूनच की काय एखाद्या गायकाच्या अवघड 'तानेला,' तेंडुलकरच्या सिक्सरला, नदीसंगमावरच्या सनसेटला आणि पूर्वकल्पना न देता अचानक घरी आलेल्या आवडत्या व्यक्तीच्या स्वागताला हेच तीन शब्द ज़िभेवर येतात. 'क्या बात है'चा पुकारा तुमच्या अंतरंगात उमटणारे तरंगच मुखाद्वारे प्रकट करतो.

अंडरवर्ल्डच्या प्रभावाखाली बॉलीवूड आणि बॉलीवूडच्या छत्रछायेखाली तमाम युवा वर्ग त्यांची 'लिंगो' जशीच्या तशी उचलतो आणि रोजच्या जीवनात घोळवतो. सुंदर युवतींना संबोधण्यासाठी प्राकृत, संस्कृत, राष्ट्रभाषा अपुरी पडते, की काय म्हणूनच आयटम, सामान किंवा माल असे तद्दन व्यापारी आणि 'आज रोख उद्या उधार' छाप शब्दांची मध्यंतरी चलती आली. कमनीय बांध्याच्या मुलींना मग जास्त भाव येऊन त्याही आपल्या मोहक चालीने युवकांच्या दिलाचा तराजू वरखाली करीत राहिल्या.

आता 'रापचिक' या शब्दाचा अर्थ तुम्ही मला विचारू नये आणि मीही सांगू नये कारण शिंचा अर्थ असायला तर हवा. माल, आयटमसारख्या विशेषनामांना परिपूर्ण विशेषणाचं काम 'रापचिक' हा शब्द यथोचितरीत्या करतोच. वर उच्चारताना चेहऱ्यावरच्या प्रत्येक स्नायूला जो काही व्यायाम घडतो, तो निराळाच.

बाटलीचे बूच हे मनुष्य स्वभावाचे वर्णन करण्यासाठी वापरात आणले जावे, हे त्या बुचाचे की माणसाचे कमनशीब हे ज्याचे त्याने ठरवावे. एक मात्र खरे की 'ढक्कन'च्या उच्चारातच जे काही 'वाया गेले पण' करकचून आवळलेले आहे ते इतरत्र नाही. मूर्खपणा हा तुमच्या डोक्याच्या बरणीत घट्ट भरून ठेवलेला आहे आणि तिचे झाकण उघडून तुम्ही त्याचे सार्वजनिक वाटप वेळोवेळी करीत असता असा तर अर्थ यामागे अभिप्रेत नसावा.

'सह्ही' हा शब्द कसा प्रचलित झाला, माहिती नाही. परंतु, पसंती अगर कौतुकाची दाद देण्यासाठी याचा वापर एकदम 'सही.' चांगला शर्ट किंवा परफेक्ट फिटिंगच्या मिनी/ मायक्रोला 'सही'चा भुवया उंचावत पडलेला ठप्पा तो कपडा घातल्याचे सार्थक आणि मोजलेल्या रुपड्या वसूल झाल्याचे कौतुक परिधान करणाऱ्याच्या चेहऱ्यावरून ओसंडवतो.

काल द्रविड काय 'सॉल्लीड' खेळला रे किंवा परवाच्या पिकनिकला काय 'सॉल्लीड' गंमत आली माहितीए अशी जरा टिपिकल इंग्रजाळलेल्या तरीही मराठीचे धुलीकण पायावर मिरविणाऱ्या कंपूची प्रतिक्रिया अभिव्यक्ती. याउलट सह्याद्रीची माती अंगाखांद्यावर अभिमानाने मिरविणाऱ्या बेधडक, रांगड्या तरुणाईचा शब्दवापरही तसाच जरा अंगावर येणारा पण भावणारा. मनपसंत गोष्ट नजरेला पडल्यावर किंवा कसा आहेस? ला बुळबुळीत 'ठीक आहे किंवा छान'पेक्षा 'एकदम झकास'चे उत्तर सेंटपरसेंट मराठमोळे. तुमच्या एखाद्या धाडसी कृतीला मित्रमंडळीमध्ये मान्यता पावण्यासाठी 'जबरी'चा पंच एकदम गरजेचाच. उच्चारकर्त्याच्या थरथरणाऱ्या जिभेने वातावरणात एकदम कंप भरून द्यावा इतका थरथराट हा शब्द निर्माण करतो. 'च्यायला-मायला'चा वापर तर अगदी मिठासारखा.

'फ़ालतू' आहे साख्खा शब्द वापरून तुम्ही एखाद्या गोष्टीतला फोलपणा व्यक्तच करू शकत नाही. त्याला हवा अगदी ऐकल्याबरोबर कीव करायला भाग पाडणारा 'भंकस.' ए साला काय भंकस आहे? म्हणून एखाद्याला थर्ड क्लासच्याही मागे ढकलणारा शब्द कॉलेजकट्ट्यावर अगदी कॉमन.

उलटी, पलटी नाहीतर 'कलटी.' गुदरलेल्या प्रसंगातून मोक्याच्या क्षणी बाहेर पडण्यासाठी एक अत्यंत धाडसी, अभिनव आणि बुद्धिचातुर्याने (?) भारलेला मार्ग म्हणजे कल्टी मारणे. अर्थात पळ काढणे किंवा पोबारा करणे होय. एखाद्या तुडतुड्या गावाकडच्या पोराला अंटरएस्टीमेट करून छळण्यासाठी त्याच्यामागे लागणे आणि त्याने भन्नाट शिट्टी वाजवून त्याच्या होस्टेलचा अख्खा मजला रस्त्यावर उतरविल्यानंतर जे काही करावे लागते, त्यालाच म्हणतात 'कल्टी मारणे.' रंगसंगतीच्या बाबतीत मार खाल्लेली खरेदी अंगावर कुणी मिरवत असेल तर 'काय आज एकदम झ्यॉंगपॅंग?'ची प्रतिक्रिया एखाद्याला थेट घरी पिटाळू शकते (अर्थात अवतार बदलण्यासाठी). मित्रमंडळींकडून आलेले असे चारदोन रिमार्कस् चुकलेला चॉईस अधिक प्रकर्षाने जाणवून देतात.

दोन जणांच्या भांडणात काहीही संबंध नसताना, तिसरा कुणीतरी 'इंप्रेशन' टाकण्याच्या हेतूने मध्ये पडणे आणि नंतर 'सॉल्लीड' मार खावा लागणे यालाच म्हणतात 'पोपट' होणे.

'नीलायमला मॅटिनी शोला गेलो होतो रे काल दुपारी,' शेजारी कोण असेल विचार? अरे ती. तिला पाहिली आणि आपली तर एकदम 'दांडीच गूल' यार. असा क्लिनबोल्ड होणं म्हणजे बरंच काही करायचं मनात असूनही (जे वायफळ गप्पांमधून चारचौघांना आवर्जून माहीत करून दिलेलं) प्रत्यक्ष कृतीत उतरविता न येणं.

अशा चित्रविचित्र शब्दांनी भारलेली प्रतिक्रिया देण्यात मुलीही फार मागे नाहीत. क्लासरूमच्या खिडकीबाहेर घोटाळणाऱ्या मैत्रिणीच्या 'प्रेमप्रकरणाला' ए बघ तुझा 'छावा' आलाय, अशी माहितीवजा डिवचणी मिळतेच मिळते. घोड्यावर पैसे लावणाऱ्या जमातीला 'पंटर' असे संबोधतात आणि प्रियकरांनासुद्धा. का? हे त्या पोरींनाच ठाऊक.